**प्रेसनोट दिनांक ०७/०४/२०१९**

**विमानतळ पोलीस स्टेशन पुणे**

**विमानतळ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ७०/२०१९ भा.दं.वि.कलम ४१९,४२०,३४ हा गुन्हा उघडकिस आणुन त्यामध्ये ३ आरोपी अटक करुन विमानतळ पोलीसांनी उत्कृष्ठ कामगिरी केले बाबत....**

दिनांक २/०२/२०१९ रोजी इसम नामे तेजस कोंडीभाऊ येवले वय ३३ वर्षे रा. सर्व्हे नं. ६/१परमार स्केअर सोसायटी,फलॅट नं. २०३/२०१४ खराडी पुणे यांनी विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथे हजर होवुन फिर्याद दिलेत मजकुर की, यातील आरोपी नामे १.विश्वराज जयदेव देवार ऊर्फ विश्वराज सितारामन आनंदमोहन वय ३६ वर्षे मुळ रा. तामिळनाडु राज्य, २. पिंकी विश्वराज जयदेव देवार ऊर्फ राणी वासुदेवन पिल्ले वय ३१ वर्षे रा. घोरपडी पुणे, ३ कस्तुरी सतीश ऊर्फ अनु वासुदेवन पिल्ले वय २९ वर्षे रा.सदर यांनी फिर्यादी यांची किंमत रुपये १६,००,०००/- ची इनोव्हा कार नं. एम एच १२/ एन यु ६०४२ ही फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन भाडे तत्वावर घेवुन त्यांची इनोव्हा कार व भाडेतत्वाचे झालेले पैसे ४ लाख रुपये हे न देता अन्यायाने विश्वासघात करुन पुणे शहरातील इतर लोकांना वेगवेगळया स्किम सांगुन विश्वास संपादन करुन त्यांचेकडुन अॅडव्हॉन्स स्वरुपात पैसे स्विकारुन त्यांना पैसे परत न करता, तसेच कंपनीचे कामगारांना पगार न देता फिर्यादी यांची कार घेवुन जावुन फिर्यादी यांची एकुण २० लाख रुपयांची आर्थीक फसवणुक केली, तसेच फिर्यादी यांचे प्रमाणेच इतर लोकांना शैक्षणिक लोन, विधवा लोन, कार लोन, पर्सनल लोन, अशा इतर वेगवेगळया स्किम सांगुन लोकांनकडुन इतर रक्कमा अॅडव्हॉन्स म्हणुन स्विकारुन त्यापैकी ५ लोकांना लोन मंजुर केले. व विश्वास संपादन करुन त्यांचे मदतीने इतर लोकांना चेक देवुन ठरल्या प्रमाणे लोन दिलेली नाही व त्यांच्या रक्कमा परत न देता त्यांची फसवणुक केलेली असल्याची तक्रार दिल्याने वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. दाखल गुन्हयाचा सहा पोलीस निरीक्षक श्री एम आर खोकले विमानतळ पोलीस स्टेशन पुणे हे तपास करीत असतांना त्यांनी यातील मुख्य आरोपी नामे विश्वराज जयदेव देवार ऊर्फ विश्वराज सितारामन आनंदमोहन वय ३६ वर्षे याचे मोबाईलचे टॉवर लोकेशन काढुन चेन्नई शहर तामिळनाडु राज्यामध्ये सहा.पोलीस निरीक्षक श्री सलीस चाऊस, सहा. पोलीस फौजदार सासवडे यांना तपासकामी पाठवुन तेथील स्थानिक पोलीसांची मदत घेवुन आरोपीचे ठावठिकाणाची माहीत काढुन चेन्नई येथुन आरोपी नामे विश्वराज जयदेव देवार ऊर्फ विश्वराज सितारामन आनंदमोहन वय ३६ वर्षे यास ताब्यात घेवुन व त्याने नेलेली किंमत रुपये १६,००,०००/- इनोव्हा कार नंबर एम एच १२/ एन यु ६०४२ हस्तगत करुन सदरची कार व आरोपीला विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथे दिनांक २०/०२/२०१९ रोजी आणुन हजर केले असता सहा पोलीस निरीक्षक श्री एम आर खोकले यांनी त्यास रात्रौ २२/०० वाजता दाखल गुन्हयात अटक करुन आरोपीची दिनांक ३०/२/२०१९ रोजी पर्यंतची पोलीस कस्टडीचे रिमांड घेवुन आरोपीकडे गुन्हयाचा तपास करुन त्यास मदत करणारे महिला आरोपी नामे २. पिंकी विश्वराज जयदेव देवार ऊर्फ राणी वासुदेवन पिल्ले वय ३१ वर्षे रा. घोरपडी पुणे, ३ कस्तुरी सतीश ऊर्फ अनु वासुदेवन पिल्ले वय २९ वर्षे रा.सदर यांना दिनांक २९/०३/२०१८ रोजी अटक केलेली आहे. सहा पोलीस निरीक्षक एम आर खोकले यांनी गुन्हयातील फिर्यादी यांची फसवणुक करुन नेलेली किंमत रुपये १६,००,०००/- इनोव्हा कार नंबर एम एच १२/ एन यु ६०४२ ही दोन पंचासमक्ष जप्त करुन सदरचा गुन्हा उघड करुन उत्कृष्ठ कामगिरी केलेली आहे.

(राजेंद्र पाटील)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
विमानतळ पोलीस स्टेशन पुणे